## मध्यरात्री सिनेस्टाईल पाठलाग

# वडवणी पोलिसांनी उधळला गोतस्करीचा मोठा डाव, टोळी जेरबंद !

**वडवणी | प्रतिनिधी**

वडवणी शहरात `ऑल आऊट ऑपरेशन` मोहिमेअंतर्गत नाकाबंदी सुरू असताना पोलिसांनी सिनेस्टाईल पाठलाग करून गोतस्करीचा मोठा डाव उधळून लावला आहे. या प्रकरणी पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे तीन आरोपींना अटक केली असून, न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.






**■ मध्यरात्री थरार आणि पोलिसांना जीवे मारण्याचा प्रयत्न**

दिनांक १४.०६.२०२६ च्या रात्री २३.०० ते १५.०६.२०२६ च्या पहाटे ०५.०० वाजेदरम्यान वडवणी शहरात नाकाबंदी सुरू होती. यादरम्यान पहाटे ०१.३० वाजताच्या सुमारास पोलिसांना एक पांढऱ्या रंगाची इनोव्हा गाडी (क्र. MH-04 CD-9835) संशयास्पद रित्या वावरताना दिसली. पोलिसांनी गाडी थांबवण्याचा इशारा केला असता, चालकाने गाडीचा वेग वाढवून पोलिसांना कट मारत बीडच्या दिशेने धूम ठोकली.

सपोनि वर्षा व्हागडे यांनी तात्काळ पुढील नाकाबंदीवरील पोलिसांना सतर्क केले. जगताप पेट्रोल पंपाच्या पुढे पुलाजवळ पोलिसांनी पुन्हा ही गाडी थांबवण्याचा प्रयत्न केला, मात्र चालकाने थेट पोलीस अंमलदारांच्या अंगावर गाडी घालून त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला. पोलीस अंमलदारांनी प्रसंगावधान राखत बाजूला उडी मारल्याने ते थोडक्यात बचावले.

या थरारानंतर पोउपनि श्याम गायकवाड यांनी पोलीस अंमलदारांसह स्वतःच्या गाडीतून संशयित इनोव्हाचा `प्रतिक्षा हॉटेल`पर्यंत जोरदार पाठलाग केला. पुलाजवळ इनोव्हा गाडीचा वेग कमी होताच पोलिसांनी ओव्हरटेक करून ती थांबवली. पोलिसांना पाहताच गाडीचालक व त्याचे दोन साथीदार अंधाराचा फायदा घेऊन फरार झाले. पोलिसांनी गाडीची झडती घेतली असता, त्यामध्ये दोन गोवंश जातीचे जनावरे अत्यंत क्रूरतेने डांबून व बांधून ठेवल्याचे आढळून आले.

या गंभीर घटनेनंतर वडवणी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता, प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम आणि मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपींचा शोध घेण्यासाठी दोन विशेष पथके तयार करण्यात आली होती. शेवटी दिनांक २१.०६.२०२६ रोजी लातूर जिल्ह्यातील लामजना (ता. औसा) येथे धाड टाकून पोलिसांनी ३ आरोपींना अटक केली.

**■ अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे:**

१. आमिर आसिफ सुर्वे (वय २६ वर्षे, रा. गोविंदवाडी, कल्याण (वेस्ट), ठाणे) २. आमेर शब्बीर मेमन (वय ३५ वर्षे, रा. अन्सारी चौक, पप्पल मंजिल, कल्याण (वेस्ट), ठाणे) ३. शाहेद अन्वर बिरादार (वय ३३ वर्षे, रा. लामजना, ता. औसा, जि. लातूर) अटक केलेल्या तिन्ही आरोपींना न्यायालयासमोर हजर केले असता, न्यायालयाने त्यांची तीन दिवसांची पोलीस कोठडी मंजूर केली आहे. या गुन्ह्यात आणखी काही आरोपींचा सहभाग आहे का, याचा तपास पोलीस करत आहेत.


ही यशस्वी कामगिरी प्र. पोलीस अधीक्षक मा. चेतना तिडके मॅडम, मा. अ. पोलीस अधीक्षक मा. ऋषीकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि वर्षा व्हागडे, पोलीस उपनिरीक्षक श्याम गायकवाड, सफौ/तांदळे, सफौ/कापले, पोह/विलास खरात, दादासाहेब उबाळे, साजेद सिद्दीकी, तुकाराम ढोबळे तसेच पोलीस अंमलदार मोतीराम ढवळे, योगीराज कानतोडे, अशितोष नाईकवाडे आणि वसंत करे यांनी पार पाडली.

# शॉर्टसर्किटने पत्रकार प्रशांत मस्के यांचे घर व कपड्यांचे दुकान जळून खाक; ₹1.61 लाखांचे नुकसान

**अंबाजोगाई | प्रतिनिधी:-**

अंबाजोगाई तालुक्यातील पत्रकार प्रशांत रघुनाथ मस्के यांचे घर व कपड्यांचे दुकान विद्युत शॉर्टसर्किटमुळे लागलेल्या भीषण आगीत जळून खाक झाले. या दुर्घटनेत घरातील जीवनावश्यक वस्तूंसह दुकानातील मोठ्या प्रमाणातील कपड्यांचे नुकसान होऊन अंदाजे ₹ लाख 61 हजारांचे आर्थिक नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.







मिळालेल्या माहितीनुसार, घरातील विद्युत शॉर्टसर्किटमुळे अचानक आग लागली. आगीने काही क्षणांतच रौद्ररूप धारण केल्याने घरातील फर्निचर, दूरदर्शन संच (टीव्ही), कुलर, वॉशिंग मशीन तसेच दुकानातील साड्या व इतर कपड्यांचा साठा पूर्णपणे जळून खाक झाला.

घटनेची माहिती मिळताच पोलीस पाटील, सरपंच, तलाठी आणि मंडळ अधिकारी यांनी घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. संबंधित अधिकाऱ्यांनी नुकसानीचा पंचनामा करून अहवाल प्रशासनाकडे सादर करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

या आगीत घरगुती व व्यावसायिक अशा दोन्ही प्रकारचे मोठे नुकसान झाल्याने मस्के कुटुंबावर आर्थिक संकट कोसळले आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने तातडीने आर्थिक मदत जाहीर करून नुकसानग्रस्त कुटुंबाला दिलासा द्यावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# मौजा दगडथर - घानमुख या गावातील नागरीकांना वन्य प्राण्यापासून संरक्षण व पिडीतांना मदतनिधी त्वरीत द्या

## अन्यथा वाचवा... वाचवा... वाचवा... आंदोलनाची हत्यार उपासनार - ॲड. कॉ. डी. बी. नाईक व देविदास मोहकर

**महागाव | प्रतिनिधी**

महागाव तालुक्यातील दगडथर घानमुख शिवारात गेल्या ३ वर्षापासून वरील या गावातील नागरीकांना वन्य प्राण्याचा पिकासह, पशु व मानवी जिवनाला गंभीर धोका निर्माण झाला असून आतापर्यंत वन्यप्राणी अश्वल, वाघ, रानडुक्कर, रोही इत्यादी वन्य प्राण्याचा मुक्त संचार मानवी वस्तीपर्यंत आलेला असल्याने शेतीचे कामे करणे व जिवन जगणे कठीण झाले आहे. यापुर्वी उत्तम मारोती खराटे, शिवाजी परसराम खराटे,राजु गरदाल जाधव, माधव नागोजी डोकळे, साहेबराव पागाजी खोकले, मंगल रणा राठोड,सुधाकर मोहन मुडे,दत्ता बुध्दाजी खराटे, दिपक मारोती खराटे, बिबिचंद बालु पवार इत्यादी व्यक्तींवर जिवघेना हल्ला झालेला असून आजही




भर दिवसा वन्यप्राणी रहदारीच्या रस्त्याने दिसत आहे. त्यामुळे महिला पुरुष बालक तिन्ही वर्ग शेतात जाणे भितीपोटी टाळत आहे. ऐन पेरणीच्या काळात आमच्या दोन्ही गावच्या शिवारात निर्मनुष्य स्थिती निर्माण झाली आहे.

आपण आपल्या वन विभागामार्फत दिनांक २९/०६/२०२६ रोजीपर्यंत या वन्यप्राण्याचा शोध घेवून इतरत्र हलविण्यात यावे किंवा जंगलाला तार कुंपन त्वरीत करावे आनि जखमींना त्वरीत सानुग्रह रक्कम द्यावी तसेच प्रलंबीत पिकाची नुकसान भरपाई देण्यात यावी अन्यथा आपल्या कार्यालयासमोर दोन्ही गावचे शेतकरी, महिला, पुरुष सहकुटूंब यांच्यासह वाचवा... वाचवा... वाचवा... आंदोलनाचे हत्यार उपसणार असल्याचे निवेदनातून आर. एफ.ओ. राज ओवे ठाणेदार सुनील अंभोरे यांना कॉम्रेड डी. बी. नाईक व कॉम्रेड देविदास मोहकर यांच्यासह कार्यकर्त्यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

# आष्टी तालुक्यातील वाहिरा शाळेसाठी अतिरिक्त शिक्षकांची मागणी

## गटशिक्षणाधिकाऱ्यांना ग्रामस्थांचे निवेदन



**प्रतिनिधी : सोपान पगारे**

आष्टी तालुक्यातील वाहिरा येथील जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळेत विद्यार्थ्यांची संख्या वाढत असतानाही शिक्षकांची कमतरता जाणवत असल्याने शैक्षणिक कामकाजावर ताण निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामस्थांनी आष्टी येथील गटशिक्षणाधिकारी यांना निवेदन देऊन अतिरिक्त शिक्षकांची नियुक्ती करण्याची मागणी केली आहे.

सदर शाळेची एकूण पटसंख्या सुमारे १६४ इतकी असून, या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध शिक्षकांची संख्या अपुरी आहे. परिणामी अध्यापनाच्या गुणवत्तेवर परिणाम होत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी निवेदनात केली आहे.

वाहिरा येथील ही शाळा शैक्षणिक गुणवत्तेसाठी ओळखली जाते. सन २०२३ ते २०२४ या कालावधीत 'माझी शाळा सुंदर शाळा' उपक्रमांतर्गत तालुक्यात प्रथम व तृतीय क्रमांक पटकावला आहे. याशिवाय विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांमध्ये शाळेने उल्लेखनीय कामगिरी करत अनेक पुरस्कार मिळवले आहेत. चालू २०२५-२६ शैक्षणिक वर्षातही विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये सहभाग नोंदवला आहे.

मात्र, वाढत्या पटसंख्येच्या तुलनेत शिक्षकांची संख्या अपुरी असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शाळेस किमान दोन अतिरिक्त शिक्षकांची तातडीने नियुक्ती करण्यात यावी, अशी मागणी ग्रामपंचायत पदाधिकारी, पालक व ग्रामस्थांनी केली आहे.

या संदर्भात दिलेल्या निवेदनावर सरपंच संभाजी गाडे, भाऊसाहेब झांजे, गंगाधर बाबुराव आटोळे, उर्मिला घोडके, सुरेश झांजे, सुवर्णा गाडे यांच्यासह ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत. शिक्षण विभागाने या मागणीची तात्काळ दखल घेऊन आवश्यक ती कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# वाढदिवसाचे औचित्य साधून अशोक आडे मित्रमंडळाचा स्तुत्य सामाजिक उपक्रम

## रक्तदान शिबिरात ५१ रक्तदात्यांचा उत्स्फूर्त सहभाग, विद्यार्थ्यांना फळे व शालेय साहित्याचेही वाटप



**अंबाजोगाई | अशोक दळवे**

सामाजिक बांधिलकी जपत वाढदिवस साजरा करण्याचा आदर्शवत संदेश देत अशोक आडे मित्रमंडळाच्या वतीने अशोक आडे यांच्या वाढदिवसानिमित्त स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय, अंबाजोगाई येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. रुग्णालयातील रक्तसाठ्याची कमतरता लक्षात घेऊन आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात तब्बल ५१ रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडली.

ग्रामीण रुग्णालयात अनेक रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध होत नसल्याने त्यांच्या नातेवाईकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. ही गरज ओळखून अशोक आडे मित्रमंडळाने रक्तदान शिबिराचे आयोजन केले. "रक्तदान हेच श्रेष्ठदान" हा संदेश देत युवकांनी मोठ्या संख्येने रक्तदान करून उपक्रमाला यशस्वी केले.

या उपक्रमासाठी डॉ. विनय नालपे, डॉ. अमोल कापसे, डॉ. ऋषिकेश, डॉ. अक्षय कदम, डॉ. आकांक्षा उमरेडकर, डॉ. परवीन शेख, श्री. शशिकांत पारखे, श्री. आनंद सिताप, श्री. बाबा शेख, श्री. अमोल चव्हाण, श्री. महादेव शिरसाठ आणि श्री. माधव गोचडे यांनी विशेष सहकार्य केले. त्यांच्या सहकार्याबद्दल अशोक आडे मित्रमंडळाच्या वतीने सर्वांचे आभार व्यक्त करण्यात आले.

रक्तदान शिबिरानंतर सामाजिक उपक्रमांची परंपरा पुढे नेत कुरणवाडी तांडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना फळे आणि शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

या कार्यक्रमाला माजी आमदार पृथ्वीराज साठे, ग्रामपंचायत सरपंच रामराव आडे, उपसरपंच अनिल शिंदे, भावठाणा उपसरपंच आर डी नायक, वसंत नगर तांडा सरपंच विजय राठोड,युवकांचे प्रेरणास्थान अजित चव्हाण,युवकांचे प्रेरणास्थान दिपक भैय्या शिंदे, पवन चव्हाण, रफिक गवळी, लहू आडे, गजानन आडे, विजय जाधव, देवा जाधव, रमेश आडे, सुरेश जाधव, विजय राठोड, कुंडलिक जाधव, प्रकाश आडे, गणेश जाधव, पवन आडे, अनिल राठोड, दिलीप पवार, देवा आडे, प्रवीण आडे, उमेश आडे, विष्णू आडे, अमोल आडे, शुभम आडे, विकास आडे, ईश्वर आडे, अजय आडे, राहुल आडे, रविकांत आडे, लक्ष्मण पवार, संजय राठोड, कैलास राठोड, अविनाश चव्हाण, रवी राठोड, श्याम आडे, समाधान आडे, अजित आडे, पप्पू आडे यांच्यासह अशोक आडे मित्रमंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वाढदिवस केवळ उत्सव म्हणून न साजरा करता समाजोपयोगी कार्यातून साजरा करण्याचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत असून, रक्तदानासारख्या जीवनदायी कार्यामुळे अनेक गरजू रुग्णांना याचा लाभ होणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
Last page
बीड, मंगळवार, 23 जून 2026

# पुण्याची पुनरावृत्ती परळी शहरात विषारी हातभट्टी पिऊन युवकाचा मृत्यू

## दारू विक्रेत्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा नातेवाईकांची मागणी





नातेवाईकांचा परळी पोलीस ठाण्यासमोर ठिय्या, दारूबंदी करा अथवा बॉडी पोलीस ठाण्यात आणून ठेऊ , संतप्त नागरिक आक्रमक

परळी | प्रतिनिधी

बीडच्या परळी शहरात पुणे शहरातील पुनरावृत्ती झाल्याचे पाहायला मिळत आहे पुणे शहरात हातभट्टी दारूमुळे अनेक युवकांचा मृत्यू झाल्याचे ताजी घटना असतानाच बीडच्या परळी शहरात पुणे प्रकरणाची पुनरावृत्ती साठे नगर भागात झाल्याची माहिती मिळाली आहे.

परळी शहरातील साठे नगर भागात एका तरुण युवकाची विषारी हातभट्टी दारू पिऊन मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडल्याचे नातेवाईकांनी सांगितले. संतप्त नातेवाईकांनी परळी पोलीस ठाण्यामध्ये ठिय्या मांडला असून अनेक वेळा दारूबंदीसाठी निवेदन मोर्चे काढले असून पोलिसांनी कसल्याही प्रकारची कारवाई न केल्यामुळे आज एका युवकाला आपला जीव गमवावा लागला आहे या दारू विक्री कडे परळी पोलिसांचे कायमच दुर्लक्ष झाल्याचे नातेवाईकांचा आरोप आहे दारूबंदी करावी म्हणून अनेक वेळा साठे नगर भागातील नागरिकांनी मोर्चे काढले अनेक निवेदन दिले मात्र जाणून-बुजून परळी पोलिसांचे याकडे दुर्लक्ष झाल्याचे नातेवाईकांनी सांगितले. या तरुणाच्या मृत्यूला परळी पोलीस जबाबदार असल्याची नातेवाईकांची संतप्त प्रतिक्रिया आहे आज पर्यंत परळी पोलिसांनी कुठल्याही हातभट्टी दारूवर कारवाई केली नसल्याने खुलेआम हातभट्टी दारू विक्री सुरू होती नागरिकांनी वारंवार पोलीस ठाण्याला माहिती देऊन सुद्धा साठे नगर भागातील अंमलदार यांनी दुर्लक्ष केले आहे असे साठे नगर भागातील नागरिकांचे म्हणणे आहे.

पुण्यामधील घटनेत दारू विक्रेत्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला आहे त्याच प्रकारे या तरुणाचा सुद्धा मृत्यू झाला आहे त्यामुळे साठे नगर भागातील दारू विक्रेत्यावर मनुष्यवादाचा गुन्हा दाखल करावा असे निवेदन साठे नगर मधील महिला व नागरिकांनी दिले आहे.




# वादळ वाऱ्याने निकम कुटुंबीयांचा संसार उध्वस्त

## आ. रमेशआप्पा कराड यांनी संपूर्ण साहित्य देऊन आधार दिला

लातूर | प्रतिनिधी

अचानकपणे वादळ वाऱ्यासह अवकाळी पाऊस होऊन लातूर ग्रामीणच्या भादा सर्कल मधील मौजे वानवडा येथील अल्पभूधारक शेतकरी काशिनाथ सिद्धू निकम यांचे संपूर्ण घर आणि घरालगत असलेल्या व्यवसायाचे संपूर्ण नुकसान होऊन निकम कुटुंबीय उध्वस्त झाल्याने लातूर ग्रामीणचे आ. श्री. रमेशआप्पा कराड यांनी तात्काळ सदर कुटुंबीयास संसार उपयोगी साहित्यासह सर्व प्रकारची मदत केली.

अद्यापही मृगाचा पाऊस झाला नाही सर्वजण पावसाची वाट पाहत असतानाच शनिवारी अचानकपणे वादळ वाऱ्यासह अवकाळी पाऊस होऊन अनेकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. लातूर ग्रामीण मतदार संघात असलेल्या भादा सर्कलमधील मौजे वानवडा येथे झालेल्या अवकाळी पावसामुळे आणि वादळ वाऱ्यामुळे अल्पभूधारक शेतकरी काशिनाथ सिद्धू निकम यांचे घरासह घराच्या परिसरात थाटलेल्या किराणा दुकान, पानटपरी आणि आरो प्लांट या व्यवसायाचे मोठे नुकसान झाले. अत्यंत गरीब असलेल्या निकम कुटुंबीयांनी कष्टातून छोटे-मोठे उद्योग व्यवसाय सुरू करून आपली उपजिविका भागवत असतानाच अचानक झालेल्या या नैसर्गिक आपत्तीमुळे घरावरील संपूर्ण पत्र्याचे शेड उखडून गेले. साईडच्या भिंती जमीन दोस्त झाल्याने अनेक वस्तूची मोडतोड झाली. अवकाळी पावसाने अन्नधान्य, कपडे, अंथरून पांघरून भिजून गले. संसार उपयोगी भांडीकुंडीसह सर्व प्रकारच्या वस्तू आणि साहित्याची दयनीय अवस्था निर्माण झाली तर किराणा दुकानासह पानटपरी बरोबरच अत्यंत मेहनतीतून आणि कष्टातून उभारलेला आरो प्लांट (शुद्ध पाणीपुरवठा) छोटासा व्यवसाय उध्वस्त झाला.

या नैसर्गिक आपत्तीत उघड्यावर आलेल्या निकम कुटुंबीयांना लातूर ग्रामीणचे आ. श्री. रमेशआप्पा कराड यांनी शनिवारी मोठा आधार दिला. भाजपाच्या लातूर येथील संवाद कार्यालयात कदम कुटुंबीयातील सुमनबाई काशिनाथ निकम व त्यांचा मुलगा बळीराम निकम यांना आ. रमेशआप्पा कराड यांनी संसार उपयोगी सर्व प्रकारची भांडीकुंडी व इतर साहित्यसह दैनंदिन वापराचे कपडे, अंथरून पांघरून यासह तात्काळ लागणारे अन्नधान्य देऊन मोठा आधार दिला.

याप्रसंगी जिल्हा परिषदेचे सदस्य महादेव साळुंके, रेणापूर तालुका संगायो अध्यक्ष सतिश आंबेकर, वानवडा येथील सरपंच फुलचंद अंधारे, उपसरपंच दीपक काळे, लिंबराज सोमवंशी, राजेंद्र घोडके, नितीन अंधारे यांच्यासह इतर अनेकांची उपस्थिती होती. आ. रमेशआप्पा कराड यांनी तातडीने मदत देऊन मोठा आधार दिल्याबद्दल निकम कुटुंबीयांनी यावेळी आ. कराड यांचे आभार व्यक्त केले.

# आष्टी तालुक्यात स्मार्ट मीटरला तत्काळ स्थगिती द्या, अन्यथा तीव्र आंदोलन करणार!

## मनसेचे कैलास दरेकर यांचा प्रशासनाला गर्भित इशारा

आष्टी | प्रतिनिधी

महावितरणकडून आष्टी तालुक्यात बसवल्या जाणाऱ्या स्मार्ट मीटरविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेना शेतकरी सेनेचे बीड जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांनी अत्यंत आक्रमक भूमिका घेतली असून, हे मीटर तातडीने स्थगित न केल्यास 'मनसे स्टाईल'ने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा प्रशासनाला दिला आहे. आधीच निसर्गाची अवकृपा आणि आर्थिक संकटात सापडलेल्या सर्वसामान्य जनतेची व शेतकऱ्यांची परिस्थिती बिकट असताना, महावितरणकडून स्मार्ट मीटर बसवण्याची सक्ती केली जात आहे. या नवीन मीटरमुळे ग्राहकांचे वीज बिल अव्वाच्या सव्वा येण्याची मोठी भीती व्यक्त होत असून, प्रशासकीय धोरणावर कडक शब्दांत टीका करत कैलास दरेकर यांनी गरिबांची



ही आर्थिक लूट कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतली जाणार नाही, असे ठणकावून सांगितले आहे. सामान्य जनतेला आणि शेतकऱ्यांना पुरेशा विश्वासात न घेता, तसेच कोणतीही जनजागृती न करता हे मीटर सक्तीने लादले जात असल्याचा आरोप त्यांनी केला असून, आष्टी तालुक्यातील एकाही भागात किंवा शेती पंपावर स्मार्ट मीटर बसवू नयेत आणि या प्रक्रियेला तात्काळ स्थगिती द्यावी, अशी स्पष्ट मागणी निवेदनाद्वारे केली आहे. जर महावितरण आणि प्रशासनाने ही सक्ती थांबवली नाही, तर संपूर्ण आष्टी तालुक्यात मनसे शेतकरी सेनेच्या वतीने रस्त्यावर उतरून धडक आंदोलन केले जाईल आणि त्यातून निर्माण होणाऱ्या गंभीर परिस्थितीला सर्वस्वी प्रशासनच जबाबदार असेल, असा सज्जड दमही त्यांनी दिला आहे. मनसेच्या या आक्रमक पवित्र्यामुळे आष्टी तालुक्यातील राजकीय आणि सामाजिक वातावरण चांगलेच तापले असून, या भूमिकेला स्थानिक नागरिक आणि शेतकऱ्यांचा मोठा पाठिंबा मिळत असल्याचे चित्र दिसत आहे.

# महेश नवमी निमित्त आयोजित आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

## 61 जणांची आरोग्य तपासणी; 80 रक्तदात्यांनी केले रक्तदान

परळी वैजनाथ | प्रतिनिधी

महेश नवमी २०२६ निमित्त स्व. कौसल्याबाई गोविंदलालजी नावंदर यांच्या स्मरणार्थ परळी माहेश्वरी महिला संघटना आणि परळी तालुका माहेश्वरी युवा संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या समाजोपयोगी उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या उपक्रमात ६१ जणांची आरोग्य तपासणी करण्यात आली तर ८० रक्तदात्यांनी रक्तदान केले.




या शिबिरामध्ये नागरिकांसाठी सीबीसी, एचबीए1, आणि लिक्विड प्रोफाईल यांसारख्या महत्त्वाच्या आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. एकूण ६१ नागरिकांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला, तर ८० रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले. यावेळी उपस्थित वैद्यकीय तज्ज्ञांनी नागरिकांना आरोग्यविषयक मार्गदर्शन करत नियमित आरोग्य तपासणीचे महत्त्व पटवून दिले. तसेच निरोगी जीवनशैलीचा अवलंब करण्याचे आवाहन करण्यात आले. रक्तदान हे श्रेष्ठ दान असून त्यामुळे अनेकांचे प्राण वाचू शकतात, याबाबतही जनजागृती करण्यात आली.

कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर, समाजबांधव व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी महिला संघटना, युवा संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व स्वयंसेवकांनी विशेष परिश्रम घेतले. समाजहिताच्या अशा उपक्रमांमुळे सामाजिक ऐक्य आणि सेवाभाव अधिक दृढ होत असून, परळी तालुक्यात या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.